Close 21 वी बैठक

(209)

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव


**महाराष्ट्र शासन**
**महसूल व वन विभाग**
**जिल्हाधिकारी व जिल्हादंडाधिकारी कार्यालय, रायगड - अलिबाग**
**हिराकोट तळयाजवळ, अलिबाग, ता.अलिबाग, जि.रायगड ४०२ २०१**
❖ दुरध्वनी क्र : ०२१४१-२२२११८/२२२०९७/२२२३२२ ❖ फॅक्स क्र : ०२१४१-२२७४५१ ❖
❖ ई-मेल : tahasildarmahasul@gmail.com ❖


क्रमांक:मशा/जमीन/अ-०३/कांदळवन/तक्रार/८३४९४/२०२३ दिनांक: २०/०५/२०२३

प्रति,

मा. अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक,
कांदळवन कक्ष,
३०२, वेक फिल्ड हाऊस, ३ रा मजला,
ब्रिटानिया रेस्टॉरंट जवळ, बॅलार्ड ईस्टेट,
फोर्ट, मुंबई-४००००१.

**विषय:- Mangrove Destruction In Diveagar Village of Raigad District**
**(तक्रार क्र.२०९)**

संदर्भ:- आपलेकडील पत्र जा.क्र./ल.ले./का.स/२७०/सन २०२२-२३
दिनांक ०७/०२/२०२३

उपरोक्त विषयान्वये अर्जदार श्री.शरिफ बोडलाजी, दिवेआगर, ता.श्रीवर्धन, जि.रायगड यांनी आपल्या कार्यालयाकडे ईमेलव्दारे तक्रार अर्ज दाखल केला आहे. सदर तक्रार अर्जाचे अनुषंगाने उपविभागीय अधिकारी, श्रीवर्धन त्यांचेकडील दि. २८/०२/२०२३ रोजीच्या पत्रान्वये खालील प्रमाणे अहवाल सादर केलेला आहे.

**कांदळवन/पाणथळ तक्रारीचा पुर्तता अहवाल**

| अ.क्र. | तक्रारीचा तपशिल | कार्यवाहीचा तपशिल |
|---|---|---|
| १. | तक्रारदाराचे नांव व दिनांक | श्री.शरिफ बोडलाजी, दिवेआगर, ता.श्रीवर्धन, जि.रायगड |
| २. | तक्रारीचा विषय | महाराष्ट्र रायगड जिल्हयातील दिवेआगर गावात खारफुटीचा नाश केलेबाबत |
| ३. | तक्रारीशी संबंधित जागेचा तपशिल उदा.स.नं.गावाचे नांव, तालुका | मौजे दिवेआगर येथील श्री.शरीफ बोदलाजी यांचे राहते घराशेजारी असलेल्या जागेत समुद्राचे भरतीचे पाणी येत-जात असते. सदर खाडी क्षेत्राला ओलांडून गाव वस्तीमध्ये जाणाऱ्या रस्त्यालगत मोकळया जागेत |
| ४. | चौकशी करणाऱ्या अधिकाऱ्याचे नांव व पदनाम | १) मंडळ अधिकारी, बोर्लीपंचतन<br>२) वनपाल दिघी (प्रभारी बोर्लीपंचतन)<br>३) तलाठी सजा, दिवेआगर<br>४) वनरक्षक शेखाडी |
| ५. | चौकशीमध्ये आढळुन आलेली वस्तुस्थिती | मौजे दिवेआगर येथील श्री.शरीफ बोदलाजी यांचे राहते घराशेजारी असलेल्या जागेत समुद्राचे भरतीचे पाणी येत-जात असते. सदर खाडी क्षेत्राला ओलांडून गाव वस्तीमध्ये जाणाऱ्या रस्त्यालगत कांदळवन वनस्पतीचा ऱ्हास झाल्याचे दिसुन येत नाही. |
| ६. | कांदळवनाचा ऱ्हास झाला आहे किंवा नाही. | कांदळवनाचा ऱ्हास झाला नाही. |
| ७. | कांदळवनाचा ऱ्हास झाला असल्यास दाखल केलेला गुन्हा क्रमांक, दिनांक व संबंधित पोलिस स्थानकाचे नांव | निरंक |
| ८. | कांदळवनाचा ऱ्हास झाला असल्यास ज्यांच्याविरुध्द गुन्हा दाखल केला आहे त्या व्यक्तींची नांवे व पत्ता | निरंक |

अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक, कांदळवन कक्ष मुंबई
आवक क्र: 1316 दिनांक: 20 JUL
प्रशासकीय अधिकारी
अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक

Mangrove comm

| | | |
|---|---|---|
| ९. | कोणत्या कायद्या अंतर्गत/कलमा अंतर्गत गुन्हा दाखल केला त्याचे वर्णन | निरंक |

उपविभागीय अधिकारी श्रीवर्धन यांचेकडील चौकशी अहवालाची त्यासोबतची कागदपत्रे माहितीसाठी व आवश्यक त्या कार्यवाहीसाठी सोबत जोडली आहेत.

(डॉ.योगेश म्हसे)
जिल्हाधिकारी रायगड

अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक, कांदळवन कक्ष मुंबई
आवक क्र: 1316 दिनांक: [illegible]0 JUL 2023
प्रशासकीय अधिकारी अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक

(११)

महाराष्ट्र शासन
महसूल व वनविभाग
उपविभागीय अधिकारी तथा उपविभागीय दंडाधिकारी, श्रीवर्धन विभाग श्रीवर्धन,
नवीन प्रशासकीय भवन श्रीवर्धन, ता.श्रीवर्धन, जि.रायगड

दुरध्वनी क्र.:- ०२१४७२२२४३५
Email ID:-sdoshriwardhan1@gmail.com

जा.क्र.जमिनबाब/कात-२/१११/३२२/२०२३

दिनांक २८/०२/२०२३

प्रति,

मा.जिल्हाधिकारी रायगड
(महसूल शाखा) अलिबाग

विषय:- महाराष्ट्र रायगड जिल्हयातील दिवेआगर गावात खारफुटीचा नाश केलेबाबत.

संदर्भ:- आपलेकडील पत्र क्र.मशा/जमीन/अ-०३/कांदळवन/तक्रार/७६१३७/२०२३, दि.७/२/२०२३

उपरोक्त विषयाचे संदर्भीय पत्रान्वये सादर करण्यात येते की, श्री.शरीफ बोदलाजी यांनी मौजे दिवेआगर गावात खारफुटीचा नाश केलेबाबत ऑनलाईन केलेल्या तक्रारी अर्जाचे अनुषंगाने मंडळ अधिकारी बोर्लीपंचतन व परिक्षेत्र वन अधिकारी यांनी संयुक्तरित्या स्थळपाहणी करुन वस्तुस्थितीचा अहवाल खालीलप्रमाणे सादर केला आहे.

अर्जदार श्री.शरीफ बोदलाजी यांचे राहते घराशेजारी असलेल्या जागेत समुद्राचे भरतीचे पाणी येत-जात असते. अशा खाडी क्षेत्राला ओलांडून गाव वस्तीमध्ये जाणाऱ्या रस्त्यालगत मोकळया जागेत १ ट्रॅक्टर डेब्रीज (विटा मातीचा चुरा) टाकले असल्याचे दिसून आले. सदर बाबत मंडळ अधिकारी बोर्लीपंचतन, वनपाल दिघी (प्रभारी बोर्लीपंचतन), तलाठी सजा दिवेआगर आणि वनरक्षक शेखाडी यांनी संयुक्तपणे तक्रार अर्जदार यांना पंचांसमक्ष जागेवर बोलावून पहाणी केली. त्यावेळेस असे निदर्शनास आले की, सदर ठिकाणी माती भराव केलेला नसून, कोणी अज्ञाताने जुन्या घराचा विटामातीचा चुरा (डेब्रीज) अंदाजे १ ट्रॅक्टर मोहल्ला भागात जाणाऱ्या अंतर्गत रस्त्याचे कडेला टाकलेला असल्याचे दिसून येते. सदर जागा अर्जदार यांचे घरासमोरील असलेल्या परसजागेला लागून आहे. अर्जात नमुद केलेप्रमाणे प्रत्यक्ष जागेवर कांदळवन अथवा कांदळवनाची (खार फुटीची) झाडे नाहीत. सदर जागेत भराव टाकून खारफुटी नष्ट करण्यात आलेली नाही. सदर ठिकाणापासून काही अंतरावर खार फुटीची झाडे आहेत. डेब्रीज टाकलेली जागा मोकळी आहे. कोणतीही झाडे-झुडपे नाहीत. सदर ठिकाणी समुद्राच्या भरतीचे पाणी येत-जात असते. त्यामुळे थोडया प्रमाणात गवत असून, पाणी साचलेले असते.

प्रस्तुत प्रकरणी अर्जदार यांनी प्रत्यक्ष जागेवर खार फुटीची (कांदळवनाची) झाडे नसल्याचे भराव टाकून खार फुटी नष्ट न झालेचे मान्य व कबुल केले आहे व केलेला तक्रार अर्ज मागे घेत असल्याचे पंचांसमक्ष जबाबात लिहून दिले आहे. तरी सदरचा तक्रारी अर्ज निकाली ठेवणेस विनंती आहे. सोबत जबाब, पंचनाम्याची छायांकित प्रत सादर केली आहे.

(अमित शेडगे)
उपविभागीय अधिकारी
श्रीवर्धन विभाग श्रीवर्धन

जिल्हाधिकारी कार्यालय रायगड
मध्यवर्ती नोंदणी शाखा
आवक क्र : ८३४९५
दिनांक : 02 MAR 2023
शाखेचे नांव
अ.का/नायब/तह(सामा)/उजि(सांप्र)मा.जिल्हाधिकारी

जबाब

जबाब लिहून देणार, श्री. महमद शरिफ म. ताहीर बोथलाणी रा. दिवआमर ता. श्रीवर्धन वय-४३वर्षे धंदा-नोकरी समक्ष हजर राहून मंडळ अधिकारी बोर्लीपंचतन ललाणे सजा दिवेआगर वनपाल दिघी प्रभारी बोर्लीपंचतन व वनरक्षक शेखाडी यांचे समोर जबाब लिहून देतो की, मी दिनांक २२/०९/२०२३ रोजी हॅलो फॉरेस्ट व आपले सरकार पोर्टलवर कांदळवन (खारफुटी) नष्ट करून माती भराव केलेबाबत ऑनलाईन तक्रार दाखल केली आहे. सदर तक्रार अनुसार मंडळ अधिकारी बोर्लीपंचतन, वनपाल दिघी प्रभारी बोर्लीपंचतन, ललाणे दिवेआगर व वनरक्षक शेखाडी प्रत्यक्ष जागेवर यांचा समक्ष मला बोलावून सदर जागेची पाहणी केली. त्याबाबत मी स्वत: पाहणी केली असता, माझे निदर्शनास आले की प्रत्यक्ष जागेवर मातीभराव केलेला नसून जुन्या घराचे विटामातीचा चुरा (डेब्रीज) रस्त्यालगत असलेल्या मोकळ्या जागेत टाकलेला आहे. सदर ठिकाणी कोणत्याही प्रकारचे कांदळवन किंवा खारफुटीची झाडे नाहीत व नव्हती. सदर जागा मोकळी असून भरतीचे पाणी येत नाही, सदर जागेत गवत असून पाणी साचलेले असते. डेब्रीज (विटमातीचा चुरा) टाकलेली जागा माझे घराशेजारील परस जागेला लागून आहे. सदर क्षेत्र वनखात्याचे क्षेत्रात येत नाही. प्रत्यक्ष जागेवर कांदळवन (खारफुटी) झाडे नष्ट झालेली अथवा केलेली नाहीत हे मला समजून आले त्यामुळे माझी कोणतीही तक्रार वा हरकत राहिलेली नाही. प्रत्यक्ष जागेवर माती भराव टाकून कांदळवन तथा खारफुटी नष्ट करण्यात आली नसल्याची माझी

ह. मो.पि.

पुणपणे खात्री झाला आहे त्यामुळे मी केलेला प्रकार अशी माफी घेत आहे. माझी कोणतीही तक्रार या हरकत राहिलेली नाही. कारण जबाब कोणाच्याही दबावाखाली न येता अक्कल हुशारीने लिहून दिला. वाचून पाहिला बरोबर असे.

दिनांक :- २२/०२/२०२३

ठिकाण :- दिवेआगर

(महमद शाकिक म. साहिर बोधलासी)

समक्ष

मंडळ अधिकारी बोर्लीपंचतन

वनपाल देवी (प्रभारी बोर्लीपंचतन)

तलाठी सजा दिवेआगर
ता. श्रीवर्धन, जि. रायगड.

वनरक्षक दिवेआगर
वनरक्षक शेखाडी
प्रभारी वनरक्षक बोर्ली पंचतन

# पंचनामा

आम्ही खालील सह्या करणार पंचलोक,

1) श्री. इरशाद रशिद बोधलाजी

2) श्री अ. रशिद दाऊद बोधलाजी

3) श्री. महमद अली म. ताहेर बोधलाजी

4) श्री. जलील नझीर बोधलागी

श्री. दिवेआगर ता. श्रीवर्धन समक्ष हजर राहून मंडळ अधिकारी बोर्लीपंचतन वनपाल दिघी प्रभारी-बोर्ली-पंचतन तलाठी दिवेआगर व वनरक्षक शेखाडी यांचे समोर समक्ष जागेवर हजर राहून पंचनामा लिहून देतो की मौजे गावचे रहिवासी श्री. महमद शरिफ म. ताहेर बोधलाजी यांनी हलो फॉरेस्ट व आपले सरकार पोर्टलवर मौजे दिवेआगर मोहल्ला विभाग येथे कांदळवन खारफुटी नष्ट करून भराव केलेबाबत ऑनलाईन तक्रार अर्ज केलेबाबत आम्हाला सांगण्यात आले व सदर तक्रार अर्जाची प्रत दाखवण्यात आली. त्याप्रमाणे प्रत्यक्ष जागेवर येऊन तक्रार अर्जदार व आम्हा पंचासमक्ष पाहणी केली असता असे निदर्शनास आले की, तक्रार अर्जदार यांनी अर्जात नमूद ठिकाणी दाखवले असता सदर ठिकाणी कांदळवनाची-खारफुटीची झाडे झुडपे नसून मोकळी जागा आहे. सदर जागेवर अंदाजे 7 ट्रक्टर दगड मातीचा भराव (डेब्रिज) टाकलेला असून सदर जागा दिवेआगर मोहल्ला रस्त्याला लागून असलेल्या मोहल्ल्यातील अंतर्गत रस्ता लगत आहे. प्रत्यक्ष जागेवर भरतीचे पाणी येत. सदर

पुणपणे खात्री झाला आहे त्यामुळे मी केलेला
प्रकार अर्ज मागे घेत आहे. आमची कोणतीही तक्रार
व हरकत राहिलेली नाही. कारणे जबाब कोणाचेही
दबावाखाली न येता अक्कल हुशारीने लिहून दिला.
वाचून पाहिला बरोबर असे.

दिनांक :- 22/02/2023

ठिकाण :- दिवेआगर

(महमद शफिक म. ताहिर बोधलाजी)

समक्ष

मंडळ अधिकारी बोर्लीपंचतन

एच. डी. उतेकर

वनपाल दिघी (प्रभारी बोर्लीपंचतन)

तलाठी सजा दिवेआगर
ता. श्रीवर्धन, जि. रायगड.

वनरक्षक शेखाडी
प्रभारी वनरक्षक बोर्ली पंचतन